**<u>ठळक बातम्या</u>**

- एनपीएस आणि युपीएस अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांनाही खासगी प्रमाणे शेअर बाजारात अधिक गुंतवणुकीचा मार्ग खुला

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साहित्याचा वापर करताना स्पष्ट उल्लेख करणं बंधनकारक

- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आशियान परिषदेसाठी आशिया दौऱ्यावर, चीन आणि दक्षिण कोरियाच्या नेत्यांची घेणार भेट

**आणि**

- ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारताला विजयासाठी २३७ धावांची गरज

**<><><><>**

एनपीएस अर्थात राष्ट्रीय पेन्शन योजना आणि युपीएस अर्थात युनिफाइड पेन्शन योजनेतल्या सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांनाही आता LC 75 अर्थात Life Cycle 75 आणि BLC अर्थात Balanced Life Cycle या पर्यायांचा अवलंब करता येणार आहे. आतापर्यंत केवळ खासगी क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांना या सुविधा उपलब्ध होत्या. LC 75 मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना ७५ टक्क्यांपर्यंत गुंतवणूक शेअर बाजारात करता येईल. ३५ ते ५५ या वयोगटात शेअर बाजारातल्या गुंतवणुकीचं प्रमाण कमी होऊन सरकारी आणि खासगी रोख्यातल्या गुंतवणुकीचं प्रमाण वाढेल. BLC मध्ये ४५ वर्षापर्यंत किमान ५० टक्के रक्कम शेअर बाजारात गुंतवता येईल. त्यानंतर तिचं प्रमाण कमी होईल आणि रोख्यांमधली गुंतवणूक वाढेल. हे नवे पर्याय खुले झाल्यानं सरकारी कर्मचाऱ्यांना युपीएस आणि एनपीएसमधल्या गुंतवणुकीसाठी अधिकाधिक मार्ग उपलब्ध होतील, शेअर बाजारातली गुंतवणूक वाढवण्याचा पर्याय असल्यानं त्यांना अधिक परतावा मिळवता येईल.

**<><><><>**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी ही भेट घेतल्याचं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि राज्यात महायुती ही विचारांची युती असून महायुतीत कोणताही बेबनाव नाही, याचा पुनरुच्चार त्यांनी केला. शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर केलेल्या आरोपांबाबत विचारलं असता, महायुतीत कुठेही मतभेद होता कामा नयेत, मिठाचा खडा पडता कामा नये, याची काळजी प्रत्येकानं घ्यावी, असा निरोप पक्षाकडून धंगेकरांना दिला असल्याचं शिंदे म्हणाले.

**<><><>**

बिहार विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगानं राजकीय प्रचारादरम्यान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कृत्रिम सामग्रीचं प्रकटीकरण आणि जबाबदार वापराबाबतच्या नव्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने बनवलेली अथवा बदल केलेली प्रतिमा, ऑडिओ संदेश अथवा दृकश्राव्य संदेश प्रचारासाठी वापरताना त्यावर ए-आय निर्मित, डिजिटली वर्धित अथवा कृत्रिम सामुग्री, असा स्पष्ट उल्लेख करणं, तसंच प्रदर्शित केल्या जाणाऱ्या प्रचार सामुग्रीच्या १० टक्के भागात स्पष्टपणे हा संदेश देणं बंधनकारक असेल. या प्रचार सामुग्रीमध्ये मेटाडेटा किंवा त्याबरोबरच्या संदेशात त्याच्या निर्मितीसाठी जबाबदार असलेल्या घटकाचं नाव ठळकपणे उघड करणं बंधनकारक राहील.

राजकीय पक्षांनी मतदारांची दिशाभूल करण्याच्या अथवा त्यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने कोणतीही बेकायदेशीर सामुग्री, अथवा एखाद्या व्यक्तीच्या संमतीशिवाय कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून त्याची ओळख, स्वरूप अथवा आवाज चुकीच्या पद्धतीने सादर करू नये, अथवा फॉरवर्ड करू नये असं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे.

नव्या नियमावलीनुसार राजकीय पक्षांना अशी कोणतीही सामग्री ३ तासांच्या कालावधीत काढून टाकावी लागेल, तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्यानं बनवलेल्या प्रचार साहित्याची अंतर्गत नोंद ठेवणं बंधनकारक राहील.

**<><><>**

छट पूजेच्या महापर्वानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरासह जगभरातल्या भाविकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या पूजेचं सांस्कृतिक महत्व दिवसेंदिवस वाढत

असून हा उत्सव साधेपणा आणि संयमाचं प्रतीक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. आजपासून सुरु होणाऱ्या छट पूजा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे मंत्रालयानं सहा हजारांहून अधिक विशेष रेल्वे गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. आजपासून नऊशे पेक्षा अधिक गाड्या धावतील, असं मंत्रालयानं सांगितलं आहे.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२७ वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूज-ऑन-एअर मोबाईल ॲप वर कार्यक्रम प्रसारित केला जाईल. तसंच एअर-न्यूज, डीडी न्यूज, पीएमओ आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वर कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

**<><><>**

पाकिस्ताननं भारताच्या भूभागात, विशेषतः जम्मू-काश्मीरमध्ये बेकायदेशीरपणे बळकावलेल्या प्रदेशात मानवी हक्काचं उल्लंघन थांबवावं असं आवाहन संयुक्त राष्ट्रांमधले भारताचे स्थायी प्रतिनिधी पर्वतानेनी हरीश यांनी केलं आहे. ते काल ८० व्या संयुक्त राष्ट्र दिनानिमित्त आयोजित खुल्या चर्चे दरम्यान, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेला संबोधित करत होते.

जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून तिथले नागरिक भारताची लोकशाही परंपरा आणि संवैधानिक चौकटीनुसार आपले मूलभूत अधिकार बजावत आहेत. मात्र पाकिस्तान मानवी हक्क या संकल्पनेपासून अनभिज्ञ असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><>**

पाकिस्तानचं नाव २०२२ साली करड्या यादीतून काढलं आहे तरी पाकिस्तानला दहशतवाद्यांना अर्थपुरवठा आणि मनी लाँडरिंग सारख्या गोष्टी करता येणार नाहीत, असं असं FATF अर्थात जागतिक आर्थिक कार्य दलानं स्पष्ट केलं आहे. एफएटीएफच्या अध्यक्ष इलिसा डे मड्रोज यांनी हा इशारा दिला आहे. कोणताही देश ज्यामध्ये पाकिस्तानचाही समावेश आहे त्यांनी आर्थिक गुन्हेगारी रोखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असं त्या

म्हणाल्या. जैश ए मोहम्मद ही दहशतवादी संघटना आपल्या कारवायांसाठी डिजीटल वॉलेट वापरत असल्याच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर त्याचं हे विधान महत्त्वाचं समजलं जात आहे. करड्या यादीतून बाहेर काढलेल्या देशांवरही कारवाई होऊ शकते असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><>

मलेशिया इथं होणाऱ्या आसियान शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प रवाना झाले आहेत. हा त्यांचा राजकीय दौरा असून चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम जोंग उन यांच्यासह ते अनेक महत्वाच्या नेत्यांची भेट घेण्याची शक्यता आहे. या दौऱ्यादरम्यान ट्रम्प व्यापार युद्ध संपवण्यासाठीच्या उपाययोजनांवर चर्चा करतील. नोव्हेंबरच्या एक तारखेपासून लागू होणारा अतिरिक्त शंभर टक्के कर टाळण्यासाठी चीन करार करण्यासाठी सहमत होईल, असा विश्वास ट्रम्प यांनी वॉशिंग्टन इथं बोलताना व्यक्त केला. मलेशियातल्या या दौऱ्यात ट्रम्प एका नव्या व्यापार करारासह थायलंड-कंबोडियामधल्या शांतता करारावर सुद्धा स्वाक्षरी करण्याची शक्यता आहे. त्यानंतर ते जपानच्या नवनियुक्त आणि पहिल्या महिला प्रधानमंत्री साने ताकाची यांची देखील भेट घेणार आहेत.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या अखेरच्या सामन्यात विजयासाठी भारताला २३७ धावांची गरज आहे. सिडनीमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. पण रेनशॉ वगळता त्यांच्या एकाही खेळाडूला अर्धशतकही करता आलं नाही. ४७ व्या षटकात त्यांचा पूर्ण संघ २३६ धावांवर बाद झाला. हर्षित राणा यानं ३९ धावांच्या मोबदल्यात त्यांचे ४ गडी टिपले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ९ षटकात बिन बाद ५८ धावा झाल्या होत्या. तीन सामन्यांची ही मालिका ऑस्ट्रेलियानं २-० ने आधीच जिंकली आहे.

//<><><><>//